CENTRE FOR DISTANCE EDUCATION
SNDT Women's University
Sir Vithaldas Vidyavihar, Juhu Tara Road,
Santacruz (W), Mumbai - 400 049. INDIA.

NAAC ACCREDITED

दूरस्थ शिक्षण केंद्र,
श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ
सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा मार्ग,
सांताक्रुज (प.), मुंबई - ४०० ०४९, भारत.

Tel.: 91-22-26609829 / 26607758 / 26608193 / 26608176 • E-mail : cde@sndt.ac.in • Website : www.cde.sndt.ac.in

CDE / 22/२०२२-२३/174 २२ जुलै २०२२

# सूचना

दूरस्थ शिक्षण केंद्र, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठातील नोंदणीकृत आजी- माजी सर्व विद्यार्थिनींना या सूचनेद्वारे सूचित करण्यात येत आहे की, आपल्या शैक्षणिक अथवा प्रशासकीय कामाच्या संदर्भात श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्राशी संपर्क साधत असताना केवळ दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अधिकृत दूरध्वनी आणि ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

| कार्यालयाचा संपूर्ण पत्ता | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|
| दूरस्थ शिक्षण केंद्र,<br>श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ<br>सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा रोड,<br>सांताक्रूझ (प.), मुंबई – ४०० ०४९ | 0-22-26607758 /<br>0-22-26608193 | studentsupport@cde.sndt.ac.in |

- **उपरोक्त क्रमांकाव्यतरिक्त दूरस्थ शिक्षण केंद्रातील कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक क्रमांकावर संपर्क करू नये. वैयक्तिक क्रमांकावर करण्यात आलेले संदेश आणि तक्रारी या अधिकृत समजल्या जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार त्या त्या कारणांसाठी ठरवून दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावरच / ई-मेलवर संपर्क साधावा.**
- ई-मेल पाठविताना प्रवेश अर्जामध्ये नमूद करण्यात आलेलाच ई-मेल आयडी वापरण्यात यावा.ई-मेल पाठवताना आपली संपूर्ण माहिती आणि शंका / अडचण तपशीलवार लिहावी. त्यामध्ये आपला मोबाईल क्रमांक नमूद करावा म्हणजे आवश्यकतेनुसार आम्हाला आपल्याशी संपर्क साधता येईल.
- आपल्याला काही तांत्रिक अडचण / समस्या असेल तर त्याचा स्क्रीन शॉट घेऊन तो ई-मेल सोबत पाठवावा म्हणजे आपल्या अडचणीचे नेमके स्वरूप समजू शकेल.ई-मेल पाठविल्यानंतर आपली अडचण तपासून ती सोडविण्यासाठी आम्हाला दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागू शकतो. आपल्या ई-मेलचे उत्तर ई-मेलवरच पाठविण्यात येईल.
- ई-मेल /मोबाईलवरून विद्यापीठाशी संपर्क साधताना आपले म्हणणे नेमकेपणे, मुद्देसूद आणि सौम्य भाषेत मांडावे.
- विद्यापीठ कार्यालयास महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी तसेच प्रत्येक रविवारी आणि शासकीय रजांच्या दिवशी सुट्टी असते. आपण कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते १:०० आणि दुपारी २:०० ते ५.१५ या वेळेत संपर्क साधावा.

(डॉ. स्मृति भोसले)
संचालक